आपल्या परिसरातील ताज्या घडामोडींसाठी
Deshdoot Media Group
आजच डाऊनलोड करा, देशदूतचे मोबाईल अ‍ॅप!
अ‍ॅप डाऊनलोड करण्यासाठी
क्यूआर कोड स्कॅन करा!

शिल्पकार विकासाचा...

# देशदूत



पान २
पडसाद : पोलाद उद्योगावर 'वीज' कडाडली!



शेवटचे पान
ब्रिस्टलमध्ये भारताचा ऐतिहासिक विजय

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५६ । अंक २९६ । गुरुवार, दि. ३ जुलै २०२५ । पाने १२ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

## संपादकीय

### हुंडाप्रथा कधी नामशेष होणार?

हुंडाचा वरून विवाहितांच्या छळाच्या तक्रारींची संख्या दिवसागणिक वाढत आहे. गेल्या पाच महिन्यांत एकट्या मुंबईत अशा स्वरुपाच्या दोनशेहून जास्त तक्रारी पोलीस ठाण्यांत दाखल झाल्या. त्यापैकी पाच विवाहितांनी आत्महत्या केल्याचा गुन्हा दाखल आहे. त्यांच्या सासरच्या मंडळींविरुद्ध पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांत परिस्थिती यापेक्षा वेगळी नसेल. राज्यात हुंडाविरोधी कायदा आहे. कायदा मोडून हुंडा घेणाऱ्यांना कठोर शिक्षेची तरतूद त्यात आहे, पण 'जितके कायदे तितक्या पळवाटा', असे म्हटले जाते ते उगाच नाही. कायद्यामुळे हुंडा घेणे बंद झालेले नाही. फक्त हुंडा घेण्याची पद्धत बदलली इतकेच! आजही देण्या-घेण्याची छुपी पद्धत वधू-वर पक्षांकडून अमलात आणली जाते. 'मुलगा म्हणजे वंशाचा दिवा' आणि 'मुलगी म्हणजे परक्याचे धन' ही मानसिकता आजही कायम आहे. साहजिक लग्नाच्या बाजारात वरपक्ष श्रेष्ठ मानला जातो. हुंडा मागणे हा त्यांचा हक्क आहे, असे दोन्हीकडील मंडळी मानतात. ही प्रथा बंद व्हावी, अशा चर्चा संमेलने, मेळाव्यांतून रंगतात, पण घरातील लग्नकार्यावेळी वरपिता म्हणून मुलाच्या पित्याची भूमिका वेगळी असते. हुंड्यासाठी छळ झाल्याबद्दल दाखल होणाऱ्या तक्रारी वाढत असल्या तरी ते 'हिमनगाचे टोक' असू शकेल. कारण महिला सोशिक आणि सहनशील मानल्या जातात. परिणामी हुंड्यावरून होता होईल तेवढा त्रास सहन करण्याचीच मानसिकता आढळते. असह्य झाल्यावरच महिला कायद्याचा आधार घेतात. त्यामुळे दाखल न झालेल्या तक्रारींची संख्या कैकपटींनी जास्त असू शकेल. समाजात मुली आजही 'नकोशा' आहेत. मुला-मुलींच्या जन्मदरात बहुसंख्य जिल्ह्यांत बारीच तफावत आढळते. यासंदर्भात समिती नेमण्याचे आदेश नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्यांनी नुकतेच दिले आहेत. स्त्री-पुरुष गुणोत्तर विषमतेचे एक प्रमुख कारण हुंडादेखील आहे. अर्थात, काही पुरोगामी कुटुंबे या प्रथेला पूर्णतः फाटा देऊ लागली आहेत. कायदा धाब्यावर बसवून पोसल्या जाणाऱ्या हुंडाप्रथेला आळा घालायलाच हवा. त्यासाठी कायदा पुरेसा नाही. कालानुरूप त्या कायद्यातील तरतुदींत बदल करणे, त्या अधिक कठोर करणे आणि कायद्याची अमलबजावणी अधिक परिणामकारकपणे झाली पाहिजे. समाजाची जुनाट मानसिकता बदलणे हे सामाजिक संस्थांपुढील कठीण आव्हान आहे. रुढी-परंपरांमध्ये बदल करणे सोपे नसते. शिवाय हुंड्याला हव्यासाची बारीक किनार आहे. तरीही लोकांच्या मानसिकता बदलासाठी प्रबोधनाचे सातत्यपूर्ण प्रयत्न सुरूच राहणे हाच व्यवहार्य मार्ग ठरेल.

**तापमान**

किमान : २१.७°
कमाल : २७.९°

# शेतकरी प्रश्नांवर चर्चेची तयारी

## विरोधकांच्या आक्रमकतेनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे स्पष्टीकरण

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून विरोधी पक्षाने बुधवारी सलग दुसऱ्या दिवशी विधानसभेत सरकारला धारेवर धरले. शेतकरी आत्महत्यांमध्ये वाढ होत आहे. तीन महिन्यांत राज्यात ७६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. बैल नाही म्हणून शेतकऱ्याला स्वत:ला जुंपून घ्यायची वेळ आली आहे. कर्जमाफी देण्याचे आश्वासन देऊन सत्तेत आलेले सरकार आता आश्वासन विसरले असल्याची चौफेर टीका करत विरोधकांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चेची मागणी केली. त्यावर विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी याबाबतचा प्रस्ताव आणावा, मी चर्चेला पूर्ण दिवस द्यायला तयार असल्याचे विरोधी पक्षाला सांगितले. तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शेतकऱ्यांच्या सर्व प्रश्नांवर केव्हाही चर्चा करण्यास सरकार तयार असल्याचे स्पष्ट केले. मात्र, विरोधकांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या आडून राजकारण करू



राज्य विधिमंडळ पावसाळी अधिवेशन

नये, असे पवार यांनी बजावले. मात्र, तत्काळ चर्चेची मागणी मान्य न झाल्याने विरोधी पक्षांनी सभात्याग केला.

आज विधानसभेत काँग्रेसच्या



विजय वडेट्टीवार यांनी स्थगन प्रस्तावाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या मुद्याला हात घातला. राज्यात शेतकरी आत्महत्या वाढत आहेत. यावर्षी जानेवारी ते मार्च या कालावधीत ७६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. यातील २०० प्रकरणे अपात्र ठरली असून १९४ प्रकरणांची चौकशी प्रलंबित आहे. एकीकडे शेतकरी आत्महत्या करतो आहे आणि त्यांच्या वारसांना सरकार मदत देत नाही. कृषिमंत्री शेतकऱ्यांना भिकारी म्हणतात. माजी मंत्री बबनराव लोणीकर शेतकऱ्यांविरोधात आक्षेपार्ह विधान करून त्यांचा अपमान करतात. सरकारने शेतकऱ्यांच्या मालाला दीडपट भाव देऊ, असे आश्वासन दिले होते. निवडणुकीआधी कर्जमाफी करू, अशी घोषणा केली होती. आता मात्र सरकार समितीला पुढे करत आहे, अशी टीका वडेट्टीवार यांनी केली. तर शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या भास्कर जाधव यांनीही शेतकरी आत्महत्यांवर सभागृहात चर्चा घडवून आणण्याची मागणी केली.

पान १० वर

### पीकविमा योजनेला केंद्राकडून मुदतवाढ

हवामान आधारित फळ पीकविमा योजनेत अर्ज भरण्यासाठी केंद्र सरकारने मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे राज्यातील फळपीक शेतकऱ्यांना चार दिवसांचा 'विमा' दिलासा मिळाल्याची माहिती कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी बुधवारी दिली. केंद्र आणि राज्य सरकारच्या योग्य समन्वयामुळे पीकविमा काढण्यासाठी शेतकऱ्यांना आता ६ जुलै २०२५ पर्यंत अर्ज करता येणार असल्याचे कोकाटे यांनी सांगितले.

### बबनराव लोणीकर यांचा खुलासा



शेतकऱ्यांना उद्देशून वादग्रस्त विधान केल्याप्रकरणी टीकेचे धनी ठरलेले भाजप आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी विधानसभेत खुलासा केला. मी शेतकरीविरोधी बोललो असा आरोप करण्यात आला. मी गेली ४० वर्षे राजकारणात आहे. २५ वर्षे शेतकरी मला निवडून देत आहेत. मी शेतकऱ्यांसाठी मोर्चे काढले, आंदोलने केली आहेत. रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत मी शेतकऱ्यांच्या बाजूने आहे. मी शेतकऱ्यांच्या विरोधात बोललो नाही. परंतु काही लोक राजकारण करत आहेत. माझ्या मृत्यूनंतरही माझी हाडेसुद्धा म्हणतील मी शेतकरी आहे. रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत मी शेतकऱ्यांसोबत आहे, असे स्पष्टीकरण लोणीकर यांनी दिले. मी शेतकरीविरोधी बोललो असेन तर हजार वेळा माफी मागायला तयार आहे. पण माझ्या वक्तव्याची मोडतोड केल्याचा आरोपही त्यांनी केला.

# २००० कोटींची मालमत्ता हडपण्याचा डाव

## नॅशनल हेराल्ड प्रकरणात ईडीचा दावा

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

नॅशनल हेराल्ड प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) मोठा दावा केला आहे. बुधवारी दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान, ईडीने दावा केला की, काँग्रेस नॅशनल हेराल्डची सुमारे २००० कोटी रुपयांची मालमत्ता हडप करू इच्छित होती.

ईडीच्या वतीने अतिरिक्त सॉलिसिटर जनरल (एएसजी) एस.व्ही. राजू राऊस अव्हेन्यू न्यायालयात हजर झाले. त्यांनी न्यायालयाला सांगितले की, 'नॅशनल हेराल्डच्या मालमत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी यंग इंडियन लिमिटेड स्थापन करण्याचा कट रचण्यात आला होता, ज्यामध्ये काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी आणि

पान १० वर

# शेख हसीना यांना तुरुंगवासाची शिक्षा

**ढाका । वृत्तसंस्था**

येथील एका विशेष न्यायालयाने बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना सहा महिन्यांची जेलची शिक्षा सुनावली आहे. न्यायालयाचा अवमान केल्याप्रकरणी त्यांना ही शिक्षा झाली आहे. हा निर्णय आयसीटी-१ या तीन न्यायाधिशांच्या खंडपीठाने दिला आहे. शेख हसीनांनी अशी काही विधाने केली ज्यामुळे न्यायालयाचा अनादर झाला आणि न्यायव्यवस्थेच्या कामावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले.

# त्र्यंबकला पावसाने झोडपले

## गंगासागर भरला; घरे, दुकानांत शिरले पाणी

**त्र्यंबकेश्वर । प्रतिनिधी**

त्र्यंबकेश्वरला रात्रभर पावसाने चांगलेच झोडपले. त्यामुळे डोंगर-दरीतून पाण्याचे लोट नदी-नाल्यांमध्ये वेगाने वाहत आले. तर गंगासागर तलाव भरल्याने त्याचे पाणी मागील बाजूने वाहत शहरात आल्याने पूरसदृश स्थिती निर्माण झाली. त्यामुळे लोक झोपेत असतानाच घरे, दुकानांमध्ये पाणी शिरल्याने पहाटे-पहाटे नागरिकांची चांगलीच धावपळ उडाली.



पावसामुळे पाणी वाहत असल्याने रस्त्यांना नाल्याचे स्वरूप आले होते. मेनरोडवर पाणी अधिक वाहत असल्याने अनेक दुकानांमध्ये पाणी शिरून मालांचे, वस्तूंचे नुकसान झाले. त्र्यंबकेश्वरच्या पुलावरून पाणी वाहत

पान १० वर

### धरणातील विसर्ग (क्युसेस)

| | |
|---|---|
| गंगापूर | २१३२ |
| दारणा | ९३९ |
| पालखेड | १५९२ |
| नांदूरमध्यमेश्वर | १२६२० |

# वृक्षतोडबाबतचा कायदा मागे

**मुंबई । प्रतिनिधी**

बेकायदा वृक्ष तोडणाऱ्यास सरसकट ५० हजार रुपये दंड आकारणारा कायदा राज्य सरकारने बुधवारी विधानसभेत मागे घेतला. त्याऐवजी आता तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊन लवकरच नवा कायदा आणला जाईल, अशी माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत दिली.

डिसेंबर २०२४ च्या अधिवेशनात या कायद्यात सुधारणा करून हा दंड ५० हजार रुपये करण्यात आला होता.

# गरिबांना हक्काचा लाभ मिळेना!

## ईडब्लूएस आरक्षणाचे घोडं पेंड खातंय?

**नाशिक । नरेंद्र जोशी**

आर्थिकदृष्ट्या मागास वर्गासाठी केंद्र सरकारने ईडब्लूएस (इकॉनोमिकल विकर सेक्शन) ही विशेष श्रेणी निर्माण केली. यासाठी प्रवेश क्षमतेच्या दहा टक्के कोटा निर्माण केला. त्यामुळे प्रवेश क्षमतेपेक्षा दहा टक्के जास्त जागांना प्रवेश या श्रेणीतून होणे शक्य झाले. याचा फायदा आठ लाखांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या व खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना झाला. परंतु मागील वर्षापासून सोशयली इकॉनोमिकल बॅकवर्ड क्लास या कॅटेगरीत वेगळे आरक्षण लागू झाल्यानंतर मराठा समाजातील विद्यार्थ्यांना ईडब्ल्यूएसचे सर्टिफिकेट आता मिळत नसल्यामुळे त्यांची मात्र अडचण झाली आहे.

> मागील वर्षापासून लागू झालेल्या ईडब्लूएस सर्टिफिकेट मिळण्याच्या नियमाचा पुनर्विचार होणे आवश्यक आहे. कारण केंद्र सरकारने ही सुविधा उपलब्ध करून देताना मुख्यतः खुल्या वर्गातील गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाचा फायदा व्हावा असा विचार केला आहे. आर्थिकदृष्ट्या कमकुवत खुल्या वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना सुविधा या वर्षापासून शासनाने उपलब्ध करून द्यावी. केंद्र सरकारने ईडब्ल्यूएस (आर्थिकदृष्ट्या कमकुवत) करता कोटा निर्माण करताना या कॅटेगरीतील विद्यार्थ्यांना शिक्षणाचा फायदा व्हावा हा विचार केला होता. त्यावर सुप्रीम कोर्टाने आपली मोहरही उमटवली होती. परंतु महाराष्ट्र शासनाच्या धोरणात्मक निर्णयामुळे खुल्या प्रवर्गातील फार मोठा समाज या केंद्र सरकारच्या धोरणात्मक निर्णयापासून वंचित राहत आहे.
>
> ■ प्राचार्य प्रशांत पाटील


ईडब्ल्यूएसमध्ये महाराष्ट्रात फार कमी वर्ग उरल्यामुळे तसेच त्याची

पान १० वर

# शिक्षक रागावले; विद्यार्थ्याची आत्महत्या

**बुलढाणा । वृत्तसंस्था**

एका शिक्षकाने भरवर्गात अभ्यासावरील काही प्रश्न विचारले व त्याची उत्तरे न आल्याने विद्यार्थ्याला अपमानित करून विद्यार्थ्याच्या आई-वडिलांवरून अपशब्द उच्चारल्याचा प्रकार समोर आला आहे. या अपमानाचा मनात राग ठेऊन इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्याने सुसाईड नोट लिहून गळफास घेतल्याची मन सुन्न करणारी घटना बुलढाणा जिल्ह्यात घडली. विनायक ऊर्फ विवेक महादेव राऊत असे विद्यार्थ्याचे नाव आहे. पोलिसांनी आरोपी शिक्षक गोपाल सूर्यवंशी यांच्या विरोधात आत्महत्येस प्रवृत्त करण्याचा गुन्हा नोंद केला आहे.




# सुविधा विस्तारली; प्रतिसाद थंडावला

## माहेरघर योजना : पेठ, त्र्यंबकमध्ये केवळ चार महिलांनी घेतला लाभ

**नाशिक । निशिकांत पाटील**

गेल्या वर्षापासून जिल्ह्याच्या आदिवासी भागातील ५५ प्राथमिक आरोग्य केंद्रांत माहेरघर योजना सुरू करण्यात आली असली तरी पेठ आणि त्र्यंबकेश्वर भागातील केवळ चार महिलांनी योजनेचा लाभ घेतल्याचे समोर आले आहे.

जिल्ह्यातील आदिवासी भागातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपजिल्हा रुग्णालयांत माहेरघर योजना राबवली जाते. अनेकदा प्रसूती जोखमीची

पान १० वर



> यापूर्वी केवळ दोन केंद्रांत माहेरघर योजना कार्यान्वित होती. आदिवासी भागातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपजिल्हा रुग्णालयांत माहेरघर योजना गेल्या वर्षापासून सुरू करण्यात आली आहे. अतिजोखमीच्या, गुंतागुंत टाळण्यासाठी ज्यांना डॉक्टरांनी सल्ला दिला आहे अशा प्रसूतीसाठी येणाऱ्या महिलांनी पंधरा दिवस किंवा वैद्यकीय अधिकारी यांच्या सल्ल्यानुसार आधी प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल व्हावे.
>
> ■ **डॉ. हर्षल नेहते,** माता बालसंगोपन अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक